REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 4 | JANUARY - 2025

# महात्मा फुलेंची सामाजिक क्रांती : एक दृष्टिक्षेप

प्रा. डॉ. मारोती गोविंदराव गायकवाड
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, शिवनेरी महाविद्यालय,
शिरूर अनंतपाळ, जि. लातूर.

**प्रस्तावना:**



महात्मा जोतीराव फुले एकोणिसाव्या शतकातील आद्य समाजसुधारक आहेत. महात्मा फुले हे महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण भारताच्या सामाजिक क्रांतीचे प्रणेते आहेत. महात्मा फुलेंनी ब्रिटिश काळात आपल्या देशातील जात आणि धर्माच्या आडून जी बंदिस्त समाजव्यवस्था होती त्या व्यवस्थेला आव्हान देऊन सुधारणावादी चळवळ उभी केली. ही मानवी मूल्याची चळवळ माणसाच्या कल्याणासाठी आहे, हे त्यांनी सांगितले. या देशातल्या मनुनिर्मित चातुर्वर्ण्य व्यवस्थेला फुलेंनी नकार दिला. या देशात जात आणि धर्माने माणूस श्रेष्ठ नसून तो कर्तृत्वाने श्रेष्ठ असावा अशी फुलेंची भूमिका होती. महात्मा फुलेंनी जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व नाकारून “चातुर्वर्ण्यव्यवस्थेत विषमतेची बीजे आहेत, ही चातुर्वर्ण्य व्यवस्थाच हिंदू धर्माचा आधार घेऊन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही व्यवस्था निर्माण केली असून ही मानवाच्या अधोगतीला व माणूसपणाला नाकारणारी व्यवस्था संपली पाहिजे” हा विचार घेऊन समाजामध्ये कार्य सुरू ठेवले. महात्मा फुलेंनी प्रथमतः ही विषमता निर्माण करणाऱ्या व्यवस्थेचा शोध घेतला. त्यावेळी त्यांनी काल्पनिक देव आणि धर्माचा धिक्कार करून ज्या अमानवीय प्रथा आहेत त्याला नकार देण्याचे कार्य केले. अशा थोतांड कल्पनेचा धिक्कार करून 'सार्वजनिक सत्य धर्म' ची निर्मितीही केली. सार्वजनिक सत्य धर्मातून जातीजातीतील सौहार्द आणि बंधूभावावर आधारित नव्या धर्माची कल्पना फुलेंनी मांडली. या देशात जातीभेदामुळेच हिंदुस्थानला खऱ्या अर्थाने राष्ट्र म्हणून बनता आले नाही हे त्यांनी सांगितले. महात्मा फुले हे बुद्धिवादावर आधारलेल्या मानवतावादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. ‘सर्व मानवाचे हक्क सारखे असले पाहिजे, सर्वांचा निर्मिक एक असेल तर माणसा-माणसात भेदाभेद कशासाठी असावा’ हे त्यांनी निक्षून सांगितले. ते एका अखंडात म्हणतात,

"धर्मराज्य भेद मानवा नसावे।
सत्याने वर्तावे। ईशासाठी॥"

असे म्हणून माणसांचा सत्य हा एकच धर्म आहे. सत्यानेच आचरण करावे हा विचार मांडणारे आद्य समाजसुधारक म्हणून महात्मा फुले यांच्याकडे पहावे लागते. महात्मा फुलेंनी सामाजिक कार्य करताना अगोदर या देशातील मनुच्या विषमतावादी व्यवस्थेचे मूळ शोधले अर्थात जातीभेदाचे सतत समर्थन करणाऱ्या ब्राह्मणशाहीला विरोध केला. स्वतःला श्रेष्ठ व उच्चवर्णीय समजणाऱ्या लोकांनी धर्माचा आधार

घेऊन समाजातील लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन व गरिबांचे शोषण केले हे शोषण थांबले पाहिजे हा विचार घेऊन त्या शोषणाचे मूळ शोधून माणसाचे माणूसपण जपणारी व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य फुलेंनी केले आहे.

महात्मा फुलेंनी भारतीय समाजव्यवस्थेच्या शोषणाचे मूळ हे धर्मग्रंथात आणि पुराणात आहे हे सांगितले. मनुस्मृती हे जातीभेदाची विषवल्ली आहे. ही विषवल्ली मुळातून उखडून नामशेष केल्याशिवाय हिंदू समाजाची उन्नती व उत्कर्ष करता येणार नाही, असे सांगून महात्मा फुलेंनी मनुस्मृती हा ग्रंथ फेकून दिला पाहिजे असे आवाहन करताना ते आपल्या अखंडातून म्हणतात,

"आर्याची मनुस्मृती बघा, तीत आहे दगा"

किंवा

मनू धिक्कारुनी एकीकडे फेका। माना शूद्रादिका बंधुपरी।

बंधू आर्यराया दयावान व्हावा। जाळून टाकावा मनु ग्रंथ॥"

अशा अखंडातून महात्मा फुलेंनी जातीभेदाचा व माणसातील उच्च-नीचतेचे मूळ असणाऱ्या मनुस्मृतीला जाळल्याशिवाय मानवाचे कल्याण होऊ शकत नाही हे सांगितले. हिंदू पुराणकथांमध्ये ब्राह्मणाचे दैवतीकरण आणि शूद्राचे अमानुषीकरण जाणीवपूर्वक केल्याचे आढळून येते. अशा या हिंदू धर्मपुरस्कृत व्यवस्थेचा धिक्कार करून माणसाला शहाणे करुन ज्ञानी बनविण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले आहे.

महात्मा फुलेंनी ही मनुवादी व्यवस्था उध्वस्त करण्यासाठी 'गुलामगिरी' ग्रंथाचे लेखन केले आहे. अतिशय सखोल चिंतन करून ही धर्माधिष्ठित व्यवस्था नष्ट करण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती त्यांनी केली आहे. जातवर्णव्यवस्थेतील शूद्रातिशूद्र आणि महिलांच्या दाहक अपमानाच्या आणि जीवघेण्या सामाजिक, आर्थिक दुःखाच्या हुंकारातून जन्मलेला पहिला नकार आणि विद्रोह महात्मा फुलेंनी 'गुलामगिरी'च्या रूपाने शब्दबद्ध केला आहे. 'गुलामगिरी' हा ग्रंथ अनेकांना विध्वंसक वाटत असला तरी म. फुले यांनी जी व्यवस्था चालत आलेली होती त्यास नकार देऊन नवीन मानवी मूल्ये रुजविण्याचे कार्य "सार्वजनिक सत्यधर्म" या ग्रंथातून केले आहे. 'सार्वजनिक सत्यधर्मा'ची निर्मिती करणारे महात्मा फुले समजावून घेतल्याशिवाय गुलामगिरीतील नकाराचे आणि विध्वंसाचे स्वरूप समजणार नाही व त्याचे आकलन होणार नाही म्हणून महात्मा फुलेंनी निर्माण केलेली ही सामाजिक चळवळ समजून घेण्यासाठी त्यांच्या 'गुलामगिरी' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' या दोन ग्रंथाचा विचार एकत्रितपणे करावा लागतो. हे दोन्ही ग्रंथ म्हणजे व्यवस्था परिवर्तनासाठीच्या एक प्रकारच्या चळवळीच होत्या आणि या दोन्ही ग्रंथातून एकमेकांवर सामाजिक सुधारणा अवलंबून होती. इतका एकमेकांना परस्परपूरक आणि परस्परसंबंध या दोन्ही ग्रंथाचा आहे. एक यशस्वी झाल्याशिवाय दुसरी यशस्वी होणार नाही. आपल्याला महात्मा फुले हे आद्य समाजसुधारक म्हणून विचार करताना त्यांच्या 'गुलामगिरी' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' या दोन ग्रंथाचे बारकाईने निरीक्षण व आकलन होणे महत्त्वाचे आहे.

महात्मा जोतीराव फुले यांचा 'गुलामगिरी' ग्रंथ म्हणजे जोतीरावांनी सुरू केलेल्या विषमताविरोधी क्रांती आंदोलनाची नांदी होती. या पुस्तकातून 1 ते 9 प्रकरणात त्यांनी ब्राह्मणी वर्चस्वाचा इतिहास मांडला आहे. दुसऱ्या भागात 10 ते 16 या प्रकरणात प्रामुख्याने 'ब्राह्मणाची फजिती' म्हणजेच फुल्यांनी या ग्रंथातून हिंदू धर्मातील उघडकीस आणलेला दांभिकपणा मांडण्याचे कार्य केले आहे. या देशातील व्यवस्थेचा इतिहास हा बहुसंख्यांक समाजावर ब्राह्मण धर्माने लादलेल्या गुलामगिरीचा इतिहास मांडण्याचे कार्य महात्मा फुलेंनी या ग्रंथातून केले आहे. हे शोषणाचे मूळ बहुजन समाजाचे अज्ञान या गुलामीस कारणीभूत आहे हे जाणल्यामुळे महात्मा फुलेंनी अगोदर शिक्षणाला महत्त्व दिले. त्यांनी स्त्री व शुद्रातिशुद्रांना शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे यासाठी इंग्रज सरकारला ते पत्र लिहितात आणि तो शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी महात्मा फुलेंनी मुलींच्या शाळा व इतर अनेक शाळा उभारण्याची कार्य त्याकाळी त्यांनी पुण्यामध्ये केले आहे. महात्मा फुलेंनी हजारो वर्षापासून चालत आलेली गुलामगिरी ही धर्मदास्यातून निर्माण झालेली आहे. हे धर्मदास्य मानव मुक्तीसाठी झुगारून दिले पाहिजे हे विचार आपल्या ग्रंथातून मांडले आहेत. या जोतीरावांच्या सामाजिक अंतरीच्या इच्छेचे प्रतिबिंब

म्हणजे 'गुलामगिरी' ग्रंथ होय. या ग्रंथातून या व्यवस्थेतील तळातील शोषित व शूद्र माणूस बंड करण्यास तयार झाला पाहिजे, असे जोतीरावांने निक्षून सांगितले आहे. महात्मा फुलेंनी या ग्रंथातून सांगितलेले बंड हे मूल्यविरोधी बंड होते.

महात्मा फुले यांचा समतावादी दृष्टिकोन आयुष्यभर त्यांनी जपला. या जगातील सर्व माणसे समान आहेत, सर्वांचा 'निर्मिक' एक आहे मग अनंत जाती कशासाठी आहेत? हा विचार त्यांनी आपल्या अखंडातून मांडताना म्हणतात,

"सर्वांचे निर्मिती एक आहे मग अनंत जाती कशासाठी"

महात्मा फुले यांनी मांडलेला हा विचार म्हणजे मानवतेचा विचार आहे. मनुवादी विचाराने माणसात भेदभाव होऊन कपटकारस्थाने निर्माण करून माणसांमध्ये दुफळी निर्माण केली आहे. या भेदभाव करणाऱ्या व्यवस्थेवर प्रहार करण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले आहे. हिंदू धर्म आणि धर्मग्रंथ या थोतांड पुराणग्रंथाला नकार देत सत्यशोधकी माणूस निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महात्मा फुलेंनी केले आहे. महात्मा फुले यांनी सामाजिक सुधारणा हेच आपले ध्येय मानले आणि त्या दिशेने आपले कार्य सुरू ठेवले. फुलेंनी हजारो वर्षाच्या गुलामीच्या परंपरेला अत्यंत धाडसाने, धैर्याने धर्मशास्त्राला झुगारून पूर्वापार चालत आलेल्या चातुर्वर्ण्यपरंपरेला लाथाडून मानवी मूल्ये समाजामध्ये रुजवून समतेचे कार्य त्यांनी केले आहे.

महात्मा फुलेंनी सन 1869 मध्ये 'ब्राह्मणाचे कसब' हा ग्रंथ लिहून त्यांनी या ब्राह्मणी व्यवस्थेचे कपटकारस्थान उघडे केले आहे. हा ग्रंथ 'महाराष्ट्र देशातील कुणबी, माळी, मांग आणि महार या जमातींना परमप्रीतीने नजर (अर्पण) केलेला आहे'. म्हणजे या मनुवादी ब्राह्मणी व्यवस्थेने जाती निर्माण करून मानवात भेद निर्माण केले परंतु फुल्यांनी या समाजाचे विघटन हेच शुद्राच्या किंवा अंत्यजाच्या पिळवणूक व शोषणाचे कारण ठरले. म्हणून या जातींनी जातीयदृष्टीचा त्याग करून वर्गीय दृष्टीचा स्वीकार करण्याची शिकवण महात्मा फुलेंनी दिली आहे. हीच मानवतेच्या कल्याणाची जाणीव असलेले महात्मा फुले सामाजिक क्रांतीसाठी प्रेरणादायी ठरले आहेत.

महात्मा फुलेंनी समतेचे तत्व मांडून हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित जातीभेद का? आणि कशासाठी? असे प्रश्न त्यांनी ठामपणे मांडले व हजारो वर्षापासून चालत आलेल्या जातिभेदावर आपल्या विचाराचे घाव घातले. माणसाची श्रेष्ठता आणि योग्यता त्यांच्या जातीवर किंवा जन्मावर अवलंबून नसून ती त्यांच्या कर्तृत्वावर व त्यांच्या अंगभूत गुणांवर अवलंबून असली पाहिजे असे सांगितले. या वर्णव्यवस्थेतून धार्मिकतेतून आलेली जातीभेदाच्या आणि उच्च-नीचतेच्या पोटी जन्माला आलेली अस्पृश्यता मुळातूनच नष्ट केली पाहिजे म्हणून फुलेंनी आपल्या विचार व लेखनातून कपटकारस्थान करणाऱ्या ब्राह्मणावर भिक्षुकशाहीवर आणि भटशाहीवर हल्ले केले आणि ही व्यवस्था परिवर्तनासाठी आपल्या जीवाची बाजी लावण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले आहे.

महात्मा फुलेंनी समतेचा विचार आणताना ते अखंडात म्हणतात,

"ख्रिस्त, महंमद, मांग ब्राह्मणाशी।<br>
धरावे पोटाशी बंधुपरी॥"

ह्या अखंडातून मांडलेला फुलांचा विचार हा मानवतेचा व समतेचा आहे प्रत्येकाने सत्याने वागावे, जात धर्माच्या पलीकडे गेल्याशिवाय आपल्याला ही समता समाजात प्रस्थापित होऊ शकत नाही असा विचार या अखंडतून दिले आहेत.

महात्मा फुले या व्यवस्थेतील दैन्य, दारिद्र्य व गरिबीत जीवन जगणाऱ्या अज्ञानी व उपेक्षित लोकांच्या करुणेपोटी हे सामाजिक कार्य केले. बहुजन समाजाला गुलाम व दास्य बनविण्यासाठी ब्राह्मणांनी पुरातन ग्रंथ व ज्ञानाचा आधार घेऊन ते शोषण करीत होते. ही शोषण करणारी व्यवस्था मोडून काढताना सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक व्यवस्था सुधारली पाहिजे यासाठी महात्मा फुलेंनी 'सार्वजनिक सत्यधर्म' हा पर्याय म्हणून नवी मानवी मूल्ये जपणारी व्यवस्था निर्माण केली. तर शोषित, वंचित, मुली आणि शुद्रातिशुद्राना शिक्षण देण्यासाठी स्वतः स्वखर्चाने शाळा उभारल्या. फुलेंनी सत्यशोधकी समाजाची स्थापना केली. सत्यशोधक चळवळीतून सामाजिक क्रांतीसाठी बळ देणारी व्यवस्था निर्माण केली. शोषणाचे मूळ अज्ञानात आहे व हे अज्ञान दूर झाले पाहिजे हा विचार घेऊन ते शैक्षणिक कार्याकडे वळले. महात्मा फुलेंनी मुलींची पहिली शाळा तर काढली त्याबरोबर बहुजनांना शिकण्याची संधीसुद्धा आपल्या शाळेतून निर्माण

केली आहे. त्यातून बहुजनाची व अस्पृश्यांची लेकरे शिकायला लागली. त्यावेळी महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंची ही सुधारणावादी चळवळ थांबवण्यासाठी ब्राह्मणी आणि रुढीप्रिय लोकांनी या दांपत्याचा छळ केला. प्रसंगी शेण, दगड-गोटे मारले एवढेच नाही तर त्यांना संपवण्यासाठी मारेकरीही घरी पाठवून त्यांचे कार्य थांबविण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात आला. हा इतिहास सर्वज्ञात आहे. असे असतानासुद्धा फुले दांपत्य सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने आपले कार्य करीत राहिले. शिक्षणाचा मूलतः हेतू जाणताना ज्ञानाचे महत्त्व आपल्या अखंडातून ते वर्णन करतात-

"विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।।
नीतीविना गती गेली। गतिविना वित्त गेले।।
वित्तविना शूद्र खचले। एवढे सारे अनर्थ एका विद्येने केले।।"

या अखंडातील महात्मा फुलेंची भूमिका बहुजन समाजाच्या उद्धाराची ठरली आहे. आपल्या शोषणाचे मूळ हे अज्ञानातच आहे आणि हे अज्ञान नाहीसे व्हावे असे महात्मा फुलेंनी या अखंडातून समाज सुधारण्याची भूमिका अंगीकारलेली आहे. पुढे महात्मा फुलें एका अखंडात वर्णन करतात-

दरिद्री मुलांनी विद्येस शिकावे। भिक्षान्न मागावे।
पोटापुरते विद्वान वृद्धाने विद्यादान द्यावे।
भिक्षेकरी व्हावे। गावामध्ये।।
स्त्री-पुरुषासाठी शाळा त्या घालाव्या। विद्या शिकवाव्या।
भेद नाही स्व-हितासाठी खर्च जे करिती।
अधोगती जाते। जोती म्हणे।।

या अखंडाद्वारे महात्मा फुलेंनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले. गरीबी आणि दारिद्र्यात जगणाऱ्या लोकांनी विद्या शिकावी, जरी पैसे नसतील तरी भिक्षा मागून विद्या घेतली पाहिजे, ज्यांच्याकडे विद्या आहे त्या वृद्ध आणि मोठ्या लोकांनी गरिबांना द्यावी. प्रसंगी भिक्षेकरी व्हावे असा संदेश त्या काळात त्यांनी दिला आहे. स्त्री-पुरुषांसाठी शाळा घालून विद्या शिकवाव्या आणि ती शाळा शिकवताना मानवात भेद करू नये. अस्पृश्यता पाळू नये आणि जे भेद बाळगतील व स्वतःसाठी जीवन जगत असतील ते अधोगतीस पोहोचतील असाही संदेश आपल्या अखंडातून महात्मा फुले यांनी सांगितले आहे. असा हा सामाजिक परिवर्तनाचा विचार महात्मा फुलेंनी मांडून सामाजिक जनजागृतीचे कार्य केले आहे.

महात्मा फुले शोषणाबाबतीत म्हणतात की, उच्चवर्णीयाकडून जात व धर्माचा आधार घेऊन अस्पृश्यांना वाईट वागणूक देणे, अस्पृश्यांना कोणत्याही क्षेत्रात कसलाही अधिकार नसणे, त्यांना उपेक्षित जीवन जगावे लागणे ही शोषणाची मुख्य कारणे सांगून मानवी जीवनात अस्पृश्यता हा लागलेला कलंक आहे असे म्हणून मनुवादी जातव्यवस्थेतील अस्पृश्य माणसांना व समाजाला अंधकारातून बाहेर काढण्याकरता त्यांनी अनेक ग्रंथ व अखंडातून आपली भूमिका मांडली.

अस्पृश्यांना हक्काची जाणीव व्हावी याकरिता त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. 1852 मध्ये अस्पृश्यांसाठी वेताळपेठेत स्वखर्चाने एक शाळा काढली. 1853 मध्ये काही मित्राच्या साह्याने महार-मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्या करिता 'मंडळी' नावाची संस्था काढली. त्यांनी सुरू केलेल्या या कार्यातून अस्पृश्य निवारणासाठी अथक प्रयत्न त्यांनी केले. महात्मा फुलेंनी अस्पृश्यांनी आपले अज्ञान घालवायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा संदेशही दिला आहे.

अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा सुद्धा अधिकार नव्हता, अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ मानला जायचा. अशा काळात महात्मा फुलेंनी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद खुला करून शूद्रातीशूद्र समाजाला पाणी देऊन त्यांना न्याय मिळवून दिला आहे. म्हणून त्यांच्या सामाजिक कार्याकडे पाहताना महात्मा फुलेंच्या विचारात मानवीय दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. महात्मा फुलेंनी सत्यशोधक

समाजाच्या निमित्ताने सुरू केलेले अस्पृश्य उद्धाराचे आणि त्यांच्या शिक्षणाचे सामाजिक कार्य सुरू ठेवले. इथल्या शूद्र लोकांची गुलामगिरीतून सुटका होण्यासाठी अथक प्रयत्नातून मानवतेच्या संकल्पनातून त्यांनी मानवी स्वातंत्र्यासाठी धार्मिक कर्मकांडातून मुक्ती मिळवून देणारे आद्य क्रांतिकारक म्हणूनच त्यांच्याकडे पाहावे लागते. शेतकरी व कामगार यांचे दुःख व दारिद्र्य निवारणासाठी लढा उभारणारा पहिला पुढारी, जातीसंस्थेवर हल्ला चढवून मानवी समाजाची घोषणा करणारा पहिला लोकनेता, सामान्य जनतेच्या दुःखाला वेदनेला वाचा फोडणारा पहिला महात्मा आणि 'सत्यमेव जयते'च्या दिव्य तत्त्वाने भरून गेलेला खरा सत्यशोधक म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. महात्मा फुले यांनी सामाजिक समतेच्या विचाराची ज्योत तेवत ठेवून समाज निर्मिती करणारा आद्य समाज क्रांतिकारक म्हणून पहावे लागते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, संपा. हरी नरके, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई, आठवी आवृत्ती 2018.
2. महात्मा फुले समग्र वाङ्मय, य. दि. फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. पाचवी आवृत्ती 1981.
3. महात्मा जोतीराव फुले, धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती 2001.
4. महात्मा फुले : वारसा आणि वसा, भा. ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1980.
5. बा. ह. कल्याणकर, जोतीराव फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म (लोकराज्य महात्मा फुले विशेषांक), 1991.
6. गुलामगिरी, महात्मा जोतीराव फुले, आनंद प्रकाशन औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती 2016.
7. ब्राह्मणांचे कसब व इतर लेख, महात्मा ज्योतिबा फुले, साहित्य सुगंध प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2013.